स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविज्ञान विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा.

"हिंगोली जिल्हातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास' (कालखंड 2011 ते 2023)

◆ संशोधक◆

विद्या श्रीराम मगर (M.A. B.ed)

◆मार्गदर्शक◆

प्रा. डॉ. रेखा हिंगोले

संशोधन मार्गदर्शक

राज्यशास्त्र विभाग

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड

"हिंगोली जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास [कालखंड 2011 ते 2023]

प्रस्तावना

भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत सत्तेच्या विकेंद्रीकरणाला महत्वाचे स्थान आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा पाया आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे लोकशाही यशस्वी होण्यास मदत होते. हे सत्तेचे विकेंद्रीकरण केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था असे करण्यात आले आहे. शासनाची कोणतीही कल्याणकारी योजना तळागाळांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य स्थानिक स्वराज्य संस्था पार पाडतात.

भारतात स्थानिक स्वराज्य संस्था प्राचिन काळापासून वेगवेगळ्या रूपात अस्तित्वात असल्याचे दिसून येते.प्राचिन काळी पंचायत, गाव पंचायत, गण इत्यादी त्या ओळखल्या जात असत. मुघल काळामध्ये देखिल भारतात स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात होत्या. या काळात 'कोतवाल' नावाचा अधिकारी सर्व प्रकारचा नागरी कामे व कर्तव्ये पार पाडित असे. ब्रिटिश काळात स्थानिक स्वराज्य संस्थाना चालना देण्याचे कार्य करण्यात आलेले आहे. लॉर्ड रिपन यांनी 1882 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाना चालना देण्याचे कार्य केले.

स्वातंत्र्योत्तर काळात 26 जानेवारी 1950 ला भारतीय राज्यघटनची अंमलबजावणी करण्यात आली.भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख आहे. त्यामध्ये कलम 40 मध्ये प्रत्येक घटक राज्यात ग्रामपंचायत स्थापन करावी असे सांगण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत जनतेची प्रश्न स्थानिक पातळीवर सोडविले जातात. स्थानिक समस्या व गरजा याची जाणिव केंद्र व राज्य स्तरावरील नेत्यापेक्षा स्थानिक पातळीवरील नेत्यांना अधिक असते. त्यामुळे स्थानिक स्तरावली नेते अशा समस्या अधिक प्रभाविपणे सोडवू शकतात.

सत्तेचे विकेंद्रिकरणावर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भर देण्यात आला. देशातील प्रशासन लोकाभिमुख व कार्यक्षम व्हावे यासाठी 'पंचायत राज' ही व्यवस्था जिल्हा, तालुका, ग्राम स्तरावर अस्तित्वात आली. महाराष्ट्रात 1962 रोजी त्रीस्तरीय पंचायत राज अस्थिवात आले. सन 1992 च्या 73 व्या घटनादुरुस्तीने त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेतील स्थानिक स्वराज्य संस्थाना संवैधानिक दर्जा देण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेत 73 व्या घटनादुरुस्तीने महिलांना 33% आरक्षण देण्यात आले. महाराष्ट्रात सन 2011 पासून महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थात 50% आरक्षण देण्यात आले आहे. ग्रामपंचायत ही ग्राम स्तरावर गावाचा विकास करणारी महत्वाची संस्था आहे. ग्रामपंचायतीचा' प्रमुख हा सरपंच असतो. सरपंचाला गावाचा विकास करण्यासाठी सदस्याची मदत होते.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात महिला प्रतिनिधीचे प्रमाण हे अलीकडील काळात वाढत चालले आहे. महिलामध्ये राजकारणातील सहभाग वाढत आहे. राजकीय जागृती ही घडून येत आहे. महिला प्रतिनिधी ग्रामस्तरावर या सरपंच हे पद भूषवून उल्लेखनिय कार्य करत आहेत. यामध्ये विविध प्रकारचे कार्य त्यांच्यामार्फत केले जातात.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील ग्राम स्तरावर सरपंच हे पद भूषवणा-या महिला या विविध प्रवर्गातील आहेत. खुल्या प्रवर्गातील महिलानी देखिल सरपंच हे पद भूषवून ग्रामविकासात महत्वाचे कार्य केले आहे.

★संशोधन विषयाची निवड :

लोकशाही शासन प्रणालीतील सत्तेच्या विकेंद्रीकरणातील स्थानिक पातळीवरील ग्रामसभा हा महत्वाचा घटक आहे. ग्रामीण स्तरावरील लोकांच्या समस्या सोडविण्याचे कार्य हे ग्रामसभे मार्फत केले जाते, ग्रामसभेचा प्रमुख हा सरपंच असतो.

73 व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य महिलांना संस्थेत 33 % आरक्षण दिले आहे तसेच 2011 च्या कायद्याने 50% आरक्षण महिलांना दिले गेले आहे. तसेच प्रत्येक प्रवर्गासाठी सरपंच पदाच्या जागा आरक्षित असतात .त्यामुळे खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचानी देखिल आपल्या पदाला शोभेल असे उल्लेखनिय कार्य केले आहे.

ग्रामीण भागातील जनतेला वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते .तसेच ग्रामीण भागात महिलावरील बंधने ही फारशी कमी झालेले आहेत. अशा परिस्थितीत देखील ग्रामस्तरावरील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचानी केलेले काय उल्लेखनिय आहे. त्यांच्या या कार्याचा अभ्यास करण्याच्या उद्देशानें व महिलाशी संबंधित कार्य करण्याचा आवड असल्याने प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलेला आहे.

★संशोधनाची उद्दिष्ट्ये :

"हिंगोली जिल्हातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास" (कालखंड 2011 ते 2023) या संशोधन विषयांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1. हिंगोली जिल्हाची ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

2. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.

3. 73 व्या घटनादुरुस्तीने ग्रामपंचायतीत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

4. स्थानिक पातळीवरील ग्रामसभेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास करणे.

5. ग्रामपंचायतीच्या खुल्या प्रवर्गातील महिला सरपंच यांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करणे.

6.शासनाच्या विविध योजनांची ग्रामस्तरावर अंमलबजावणी करण्यासंदर्भात महिला सरपंचाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

★संशोधनाची गृहीतके:

प्रस्तुन संशोधन कार्याला अनुसरून पूर्वानुमानाच्या आधारावर काही गृहितकांची निवड केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत.

1) भारतात प्राचिन काळापासून ग्रामीण शासनपद्धती अस्तीत्वात आहे.

2) सत्तेचे विकेंद्रीकरण हे ग्रामीण स्तरापर्यंत झालेले आहे.

3) 73 वी घटनादुरुस्ती ही स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी वरदान आहे.

4) 2011 च्या कायदयाने महिलांना 50% आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये देण्यात आले आहे .

5) महिलांमध्ये राजकीय जागृती झालेली आहे .

6) महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारातील सहभाग वाढला आहे.

7) खुल्या प्रवर्गातील महिलांमध्ये नेतृत्व गुण वाढला आहे.

8)स्थानिक स्तरावरील समस्या ह्या स्थानिक पातळीवर सोडविल्या जात आहेत.

9) महिला आरक्षणामुळे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपात सहभागी होण्यास चालना मिळाली आहे.

संशोधन पद्धती :

"हिंगोली जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास " किलखंड (2011 ते 2023) या विषयाच्या अनुषंगाने खुल्या प्रवर्गातील महिलांच्या कार्याचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती:

"हिंगोली जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचाच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास " कालखंड (2011 ते 2023) या संशोधन विषयाच्या अनुषगांने अभ्यास करताना हिंगोली जिल्हयातील काही गावाची निवड करून 2011 ते 2023 या कालखंडातील महिला सरपंचांच्या कार्याचा अभ्यास केला जाणार आहे.

◆तथ्यसंकलन :

प्रस्तुत शोध प्रबंध कार्यात तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य स्त्रोताचा अवलंब केला जाणार आहे.

प्राथमिक साधने–

हिंगोली जिल्हातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचांच्या कार्याची माहिती ही प्रत्यक्ष मुलाखत घेऊन तसेच प्रश्नावलीच्या साहयाने संकलित करण्यात येईल.

दुय्यम साधने –

दुय्यम साधनामध्ये प्रकाशित व अप्रकाशित साहित्य ,पुस्तके ,अहवाल ,वर्तमानपत्रे तसेच मासिके व यासोबतच विविध वेबसाईटचा या साधनांचा वापर केला जाईल.

मर्यादा:

प्रस्तुत संशोधनासाठी "हिंगोली जिल्हयातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचांच्या कार्याचा चिकीत्सक अभ्यास" (कालखंड 2011 ते 2023)

हा विषय निवडण्यात आला आहे. सदरील संशोधन कार्याची मर्यादा ही हिंगोली जिल्हयापुरती मर्यादित आहे. या संशोधन कार्यात हिंगोली जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचांच्या कार्याचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच 2011 ते 2023 हा कालखंड निश्चित करण्यात आला आहे.

★प्रकरणाची रूपरेषा :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालीलप्रमाणे प्रकरणाची योजना केलेली आहे.

प्रकरण 1 :प्रस्तावना

या प्रकरणात विषय निश्चिती ,संशोधन समस्या, उद्दिष्टे,संशोधन पद्धती , गृहितके, तथ्य संकलन, संशोधन मर्यादा अभ्यास क्षेत्र आणि संशोधन आराखडा इत्यादीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण 2 : हिंगोली जिल्हयाची पार्श्वभूमी

या प्रकरणात हिंगोली जिल्ह्याची ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय आर्थिक तसेच शैक्षणिक पार्श्वभूमीचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण 3 : स्थानिक स्वराज्य संस्थाचे बदलते स्वरूप

या प्रकरणात स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच स्वातंत्र्योत्तर काळात स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वरूप कसे बदलत गेले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 4 – हिंगोली जिल्हातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचाच्या कार्याचे अध्ययन

हिंगोली जिल्हयातील खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचानी केलेले महत्वाची कामे ,त्यांना आलेल्या समस्या,त्या समस्यावर त्यांनी कशी मात केली. या संबंधित माहिती दिली जाईल. गावाच्या विकासात त्यांचे योगदान या बाबीचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण 5 : सारांश ,निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचा सारांश, प्रमुख निष्कर्ष मांडले जातील. स्थानिक स्वराज्य संस्थेत खुल्या प्रवर्गातील महिलांच्या सहभागासबंधी शिफारशी मांडण्यात येतील.

संदर्भ सूची :

1) शारदा प्रकाशन, नांदेड - भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

i) प्रा. बी. वाय. कुलकर्णी- भारतीय शासन आणि राजकारण

ii) प्रा. संजय खंडारे - भारतीय राज्यघटना